**परभणी येथील अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता बांधण्यात आलेल्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनाकरीता मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने अधिक्षक (महिला) पदे भरणेबाबत.**

जा.क्र.२०२२/अल्पसंख्याक/सा.प्र/कावि- ५३
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दिनांक - १८/०२/२०२२

## जाहिरात

राज्य शासनाच्या योजनेंतर्गत तसेच केंद्र व राज्य पुरस्कृत बहूक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) परभणी येथील अल्पसंख्याक मुलींसाठी बांधण्यात आलेल्या वसतीगृहांच्या व्यवस्थापनाकरीता कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात पदभरती करावयाची आहे. सदर पदांची संख्या, पदांची पात्रता व मानधन यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाची पात्रता | पद संख्या | मासिक मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक (महिला) | १.महाराष्ट्राची रहिवाशी असावी.<br>२.कोणत्याही शाखेची पदवीधर असावी.<br>३.एम.एस.सी.आय.टी/ समकक्ष परीक्षा उर्तीण<br>४.शासकीय महाविद्यालय / तंत्रनिकेतन / औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. मध्ये कार्यरत असलेल्या महिला प्राध्यापक / सह. प्राध्यापक इ.<br>५. वयोमर्यादा वय वर्ष १८ ते ४०. | १ | १५,०००/- (प्रत्येकी) |

**कार्यवाहीचा तपशील**

| कार्यवाहीचा तपशील | दिनांक |
|---|---|
| जाहिरात प्रसिध्दी (वर्तमानपत्र व वेबसाईट) | दिनांक २१/०२/२०२२ |
| जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांचे अर्ज स्विकारणे | दि.२३/०२/२०२२ ते दि. ०४/०३/२०२२ वेळ सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वा. पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) |
| जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या प्राप्त अर्जाची छाननी | दि. ०५/ ०३/२०२२ व दि.०९/०३/२०२२ |
| अर्जाच्या छाननी अंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व लेखी / तोंडी परिक्षेची सूचना प्रसिध्द करणे. | दि. १०/०३/ २०२२ |

तसेच अधिक्षक (महिला) पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना त्याचप्रमाणे अटी व शर्ती परभणी जिल्ह्याचे www.parbhani.nic.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(आंचल गोयल)
जिल्हाधिकारी परभणी

**परभणी येथील अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता बांधण्यात आलेल्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनाकरीता मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने अधिक्षक (महिला) पदभरती बाबत.**

अटी व शर्ती :-

१. अर्जाचा नमूना, पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व लेखी / तोंडी परिक्षेची सूचना या संबंधी दिनांकनिहाय कार्यक्रम या कार्यालयाच्या वेबसाईट www.parbhani.nic.in वर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२. उमेदवारांची किमान वयोमर्यादा वय वर्ष १८ ते ४० दरम्यान असणे आवश्यक आहे.

३. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभव प्रमाणपत्राच्या सत्यप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

४. सदरची नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाची मानधन तत्वावर राहील. त्यामुळे सेवा नियमित करण्याची कोणतीही मागणी करता येणार नाही किंवा ती अनुज्ञेय राहणार नाही. तसेच नियुक्तीचा कालावधी निश्चीत करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे राहतील.

५. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांस शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार मानधन देण्यात येईल.

६. निवड झालेल्या उमेदवारांस रु.१००/- च्या स्टॅंपपेपरवर (बॉंडवर) सेवेबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

७. नियुक्त उमेदवारांकडून वसतीगृह व वसतीगृह परिसरातील बांधकाम/ वस्तुंचे आर्थिक किंवा इतर नुकसान झाल्यास ते त्यांचेकडून वसूल करण्यात येईल तसेच गुन्ह्याचे स्वरुप पाहून वेळेनुसार नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

८. **नियुक्तीचे कालावधीत अधिक्षक महिला यांनी वसतीगृहामध्ये कायमस्वरुपी वास्तव्य करणे अनिवार्य राहील.**

९. काम करतांना कुठल्याही प्रकारची अनपेक्षित घटना / अपघात इ. कारणामुळे शारिरिक इजा झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

१०. नियुक्त उमेदवारास स्वत:चे इच्छेनुसार सेवामुक्त / राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी ०१ (एक) महिना अगोदर जिल्हाधिकारी कार्यालयास व संबंधित शैक्षणिक संस्थेस कळविणे बंधनकारक आहे. अशी नोटीस न दिल्यास व सेवा सोडून गेल्यास एक महिन्याचे मानधन वसूल करण्यात येईल. परंतू संबंधिताना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता काढुन टाकण्याचा किंवा सेवा कालावधी कमी करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे राहील.

११. उमेदवारांनी अर्ज सोबत जोडलेल्या नमुण्याप्रमाणे ए-४ साईजवर संगणकीकृत करुन सादर करावा व अर्जावर स्वत:चा सद्यकाळातला फोटो लावावा. तसेच उमेदवारांनी अर्जामध्ये पद स्पष्टपणे नमूद करावे.

१२. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ०४ / ०३ /२०२२ असून उमेदवारांनी सदर अर्ज अंतिम दिनांकाच्या आतच करणे आवश्यक आहे. अंतिम दिनांकानंतर तसेच जाहिरातीपूर्वी व मुलाखतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१३. प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांना तोंडी मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. उमेदवारांना मुलाखतीसाठी येण्या - जाण्याचा तसेच इतर खर्च स्वत:च भागवावा लागेल. तसेच अपात्र ठरलेल्या

उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा कारण कळविले जाणार नाही, किंवा यासंदर्भात कोणतीही सबब ऐकुण घेतली जाणार नाही.

१४. उमेदवारांना अर्जाच्या छाननीअंती मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईट www.parbhani.nic.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१५. जर मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास वेळ प्रसंगी लेखी परिक्षा व मुलाखत घेतली जाईल. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे आहे.

१६. नियुक्त उमेदवारांना उपरोक्त मानधनाव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते, सवलती अनुज्ञेय असणार नाहीत.

१७. **अर्जासोबत प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांचे नावे रु.५००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) नापरतावा म्हणून जोडणे बंधनकारक आहे.**

१८. **उमेदवार हा स्थानिक जिल्ह्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे.**

१९. उमेदवारांचे कर्तव्यस्थान हे परभणी जिल्हा असून त्यांना देण्यात येणा-या नियुक्ती आदेशानूसार जिल्ह्यांतर्गत असलेल्या वसतीगृहाचे ठिकाणी काम करावे लागेल. उमेदवारांना कर्तव्यस्थान जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नेमूण देण्यात येईल त्यासाठी उमेदवारांची पसंती विचारात घेतली जाणार नाही. परंतू नेमूण दिलेले कर्तव्यस्थान बदलण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे राहील.

२०. उमेदवारांना तोंडी मुलाखतीच्या तारखेस येतेवेळी आपले मुळ प्रमाणपत्र/ कागदपत्रांसह ०१ तास अगोदर मिटींग हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे.

२१. उमेदवारांना निकालासंबधी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईट www.parbhani.nic.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२२. अटी व शर्तीबाबत प्रचलीत तसेच शासनामार्फत वेळोवळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रक व परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात येईल, तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे राहील.

(आंचल गोयल)
जिल्हाधिकारी परभणी

# <u>अर्जाचा नमुना</u>

| |
|---|
| फोटो |

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,

अल्पसंख्याक विभाग,

परभणी.

परभणी जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता बांधण्यात आलेल्या पाथरी व पूर्णा येथील वसतीगृहाच्या व्यवस्थापनाकरीता मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने <u>अधिक्षक (महिला) कर्मचारी पदभरती</u> ------------------------------------ पदासाठी अर्ज

(लागु नसेल ते खोडावे)

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव :- ------------------------------------

(आडनाव प्रथम लिहावे)

२. पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ------------------------------------

३. भ्रमनध्वनी / दुरध्वनी क्रमांक :- ------------------------------------

४. ई-मेल आयडी :- ------------------------------------

५. जन्मतारीख (टि.सी.नुसार), वयवर्ष :- ------------------------------------

६. शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मंडळ / विद्यापीठाचे नाव | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | |
| ०२ | | | | |
| ०३ | | | | |
| ०४ | | | | |
| ०५ | | | | |

अनुभवाचा तपशिल -

| अ.क्र. | संस्था, कार्यालयाचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी / मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | |
| ०२ | | | | |
| ०३ | | | | |

**टिप :- अर्जासोबत अनुभवाचे प्रमाणपत्र साक्षांकित करुन जोडावे.**

७. अर्जासोबत सादर केलेल्या प्रती

०१. ------------------------------------

०२. ------------------------------------

०३. ------------------------------------

०४. ------------------------------------

०५. ------------------------------------

मी खालील सही करणार प्रमाणित करतो की, उपरोक्त माहिती ही खरी असून ती चुकीची आढळुन आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल. माझा अर्ज अवैध ठरल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही अथवा न्यायालयाचा मार्ग अवलंबणार नाही.

स्थळ :-

दिनांक :-

(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)